महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,

# म.स.गा. कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

मालेगाव-कॅम्प जि.नाशिक

जा.क्र.: /२०२०/२१ दिनांक.२१/०७/२०२०

## F.Y.B.A./ B.Sc / B.Com / B.B.A./ B.B.A. (C.A.)
## B.Sc (Computer Science)
## Online Admission Process : 2020-21

म.स.गा.महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष पदवी वर्गाचे प्रवेश ऑनलाईन प्रक्रियेद्वारे होणार आहेत. प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी www.msg.vriddhionline.com या संकेतस्थळाला भेट देऊन आपला मेरिट फॉर्म भरायचा आहे.**सदरचा फॉर्म स्मार्ट फोनवरुन भरता येईल.**

- मेरिट फॉर्म भरण्यासाठी **मंगळवार दिनांक २८ जूलै २०२० ते गुरुवार दिनांक १० ऑगस्ट २०२० सायंकाळी ०५.०० पर्यंत संकेतस्थळ उपलब्ध असेल.** मेरिट फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्याने मेरिट फॉर्मची सॉफ्ट कॉपी जपून ठेवावी. मेरिट फॉर्म भरतांना गुणपत्रक व जातीचा दाखला (राखीव जागेसाठी) स्कॅन करुन जोडावा. ONLINE गुणपत्रक ग्राह्य धरले जाईल.
- प्रथम गुणवत्ता यादी मेरिट फॉर्म भरण्याच्या अंतिम तारखेनंतर दोन दिवसांनी सायंकाळी ०४ वाजता संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.
- निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत संकेतस्थळाला भेट देऊन प्रवेश फॉर्म भरावा.
- प्रवेश फॉर्म भरतांना मुळ गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला (एल.सी.),गॅप सर्टिफिकेट, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, बँक पासबुक, रहिवासी दाखला (डोमिसाईल), जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे स्कॅन करुन जोडावी. (**स्कॅन ओरीजनल कागदपत्रांवरुनच करावे**.) (**फाईल साईज 500 K.B. पेक्षा मोठी नसावी**)
- मुळ गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला व गॅप सर्टिफिकेट इत्यादी संकेतस्थळावर अपलोड करावे.
- प्रवेश फॉर्म भरल्यानंतर तो प्रवेश कमेटी कडून **निश्चित झाल्यानंतर आपणांस मोबाईलवर एस.एम.एस. येईल**, त्यानंतर संकेतस्थळाला भेट देवून **पेमेंट गेट-वे पर्याय निवडून ऑनलाईन प्रवेश फी भरावी.**
- प्रवेश निश्चित करण्यासाठी **महाविद्यालयात येण्याची आवश्यकता नाही.**
- प्रवेश फी भरल्याची ऑनलाईन पावती जपून ठेवावी.
- प्रवेश फॉर्म भरुन आपला फॉर्म महाविद्यालयात प्रत्यक्ष वेळेत जमा करतेवेळी मुळ गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, गॅप सर्टिफिकेट, जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, जात वैधता प्रमाणपत्र, बॅंक पासबुक, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, विद्यार्थी सुरक्षा फॉर्म व मेडिक्लेम फॉर्म इत्यादी कागदपत्रांच्या छायांकित प्रतींची पूर्तता संबंधित विद्यार्थ्यांनी करावी, **अन्यथा अपुर्ण कागदपत्र असल्यास स्कॉलरशिपचा फॉर्म भरता येणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
- प्रवेश फॉर्म आवश्यक कागदपत्रे जोडून **ज्या दिवशी महाविद्यालय सुरु होईल त्या दिवशी** महाविद्यालयाच्या खिडकी क्र.०२ वर जमा करावा,अन्यथा प्रवेश रद्द होईल.

- प्रथम वर्ष कला वर्गासाठी-९६०, वाणिज्य वर्गासाठी-४८०, विज्ञान वर्गासाठी-३६०, कॉम्प्युटर सायन्स-१६०, बी.सी.ए.-८०, बी.बी.ए.-८० इ. जागा उपलब्ध आहेत.
- विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

| अ.नं. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १. | ONLINE मेरिट फॉर्म भरण्यासाठी संकेतस्थळावरील लिंक उपलब्धता | दिनांक २८ जूलै २०२० ते दिनांक १० ऑगस्ट २०२० सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| २. | पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणे | प्रथम गुणवत्ता यादी मेरिट फॉर्म भरण्याच्या अंतिम तारखेनंतर दोन दिवसांनी सायंकाळी ०४ वाजता प्रसिद्ध होईल. |
| ३. | पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश | गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर-<br>(दिनांक १३ ऑगस्ट २०२० ते १९ ऑगस्ट २०२०) |
| ४. | दुसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध | पहिल्या गुणवत्ता यादीची मुदत संपल्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी सहा वाजता |
| ५. | दुसऱ्या गुणवत्ता यादीतील प्रवेश | दुसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील तीन दिवस |
| ६. | तिसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध | दुसऱ्या गुणवत्ता यादीची मुदत संपल्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी सहा वाजता |
| ७. | तिसऱ्या गुणवत्ता यादीतील प्रवेश | तिसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील तीन दिवस |

**सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, म.स.गा. महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया पुर्ण करतांना खालील सूचनांचे पालन करावे.**

- विद्यार्थ्यांने सर्व प्रथम आपली नोंदणी करावी. त्यात वापरलेला ई-मेल हा त्या विद्यार्थ्याचाच कायमस्वरुपी असावा.
- विद्यार्थ्यांनी स्वतःचा ई-मेल व पासवर्ड लक्षात ठेवावा व इतर कोणाचाही ई-मेल व पासवर्ड देऊ नये.
- प्रथम मेरिट फॉर्म महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या तारखांनाच भरावे.
- मेरिट फॉर्म भरण्याची मुदत संपल्यानंतर गुणवत्ता यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.
- त्या नंतर ज्या विद्यार्थ्यांचा प्रथम गुणवत्ता यादीमध्ये नंबर असेल त्यांनीच आपण नोंदणी केलेल्या ई-मेल व पासवर्डच्या आधारे प्रवेश फॉर्म भरावा.
- प्रवेश फॉर्म भरतांना आपली माहिती अचूक असावी.
- प्रवेश फॉर्म भरुन जमा केल्यानंतर ती माहिती पडताळणी प्रवेश समितीकडे जाईल. प्रवेश समिती त्या प्रवेश फॉर्मला ऑनलाईन मान्यता देईल.
- प्रवेश समितीकडून मान्यता मिळाल्यानंतर विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रवेश फी भरावी.
- प्रवेश फी भरल्याची ऑनलाईन पावती जपून ठेवावी व प्रवेश फॉर्म आणि आवश्यक कागदपत्रे जोडून ज्या दिवशी महाविद्यालय सुरु होईल त्या दिवशी महाविद्यालयाच्या खिडकीवर जमा करावा.
- आपला फॉर्म महाविद्यालयात जमा करणे सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

**(डॉ.दिनेश शिरुडे)**